ISSN 2278-3954 Saptahik Nagara

साप्ताहिक

नगारा

संस्थापक संपादक : दलितमित्र स्व. गोविंदराव गोरवाडकर

R.N.I. No. 16746/67 पोष्टाचा परवाना क्र. एम.जी.एन.३९/२०१८-२०२०

श्री. _____

पत्ता _____

_____

वरील पत्त्यावर अंक न पोहोचल्यास परत पाठविण्याचा पत्ता : मा. संपादक सा. नगारा, ८५२, गोरवाडकर वाडा, मालेगांव कँम्प (नाशिक)

NAGARA WEEKLY

* मंगळवार दि. ९ जुलै २०१९



साक्री जि. धुळे येथील सुप्रसिध्द चित्रकार राजन पवार यांचे एक गाजलेले चित्र

मो.:- ९४२०३७४५५२

सरस्वती आणि लक्ष्मी

॥ मुक्तक ॥
प्रा.सुरेश भिलकोटकर
मो. : ९४२१६०९४३७
(लेखक मुक्त विद्यापीठात प्राध्यापक आहेत.)

एकोणीसशे पंच्याण्णवचा काळ असावा. एक दिवस मी आणि माझा एक मित्र पंचवटीतील गोदातीरी भाजी घेण्यासाठी गेलो. मित्र माझ्यासोबत विद्यापीठात अध्यापक म्हणून नोकरी करणारा, व्यावसायिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या संपन्न पार्श्वभूमी असलेल्या घरातला. तो वगळता सर्वजण व्यापारात चांगले स्थिरावलेले.

बाजार करण्याची किंवा भाजी घेण्याची प्रत्येकाची स्वतंत्र पद्धत असते. तशी माझीही आहे. भाजीबाजारात पोचल्यावर मी प्रथम बाजारातून एक धावती फेरी मारतो. ती तेथील भाज्यांची उपलब्धता, दर्जा आणि किंमतींचा अंदाज येण्यासाठी असते. त्यानंतर मग मी हवी तशी भाजी आणि हवी तेवढी भाजी खरेदी करतो. अर्थात कोणत्याही प्रकारच्या खरेदीसाठी अगोदर आवश्यकतेनुसार सर्वे करणे ही माझी नियमित पद्धत.



मित्र आणि मी बाजारात सोबत शिरलो. साधारण भाव आणि दर्जा कळण्यासाठी माझी फेरी पूर्ण होत नाही तोवर मित्राच्या हाका मारणे सुरु झाले. मी माझ्या हातातल्या रिकाम्या पिशवीसह त्याच्याकडे आलो. तर त्याच्या दोन्ही पिशव्या तट्ट भरल्या होत्या. बाजारात शिरल्यावर पहिल्या दोन तीन दुकानातच त्याची दोन मोठमोठ्या पिशव्या भरुन भाजी खरेदी झाली होती. दोन्ही पिशव्या चांगल्या मोठ्या आणि पूर्ण भरल्याने त्याला त्या धरुन चालणे किंवा त्या हातात धरुन एका जागी उभे राहणेही अवघड झाले होते. बरं भाज्या घेतल्या त्या कशा...चार कोबीचे गड्डे, चार फ्लॉवरचे कंद, दोन किलो टोमॅटो, दोन किलो भेंड्या, दोन किलो काकडी, दोन किलो गाजर, दोन किलो गवार, वगैरे वगैरे..!

"अरेऽऽऽ ..एव्हढे सारे एका दमात घेतलेस? तुला काही गावपंगत वगैरे द्यायचीय काऽऽ..?" मी म्हणालो. तो निरुत्तर..! दोन पिशव्या ओव्हरफ्लो होऊनही त्याचा महत्त्वाचा बाजार अद्याप बाकी होता. म्हणजे बायकाने आवर्जून सांगितलेली कोथंबिर, कढीपत्ता, हिरवी मिरची, लसून, कांदा घेणे बाकी होते आणि पिशव्यांमध्ये ठेवायला जागा शिल्लक नव्हती. दोन्ही पिशव्या तट्ट फुगल्या होत्या. श्रावणालत्या हिरवळीवर चरलेल्या म्हशीसारख्या!

तसा हा माझा मित्र खूप हुशार. पदव्युत्तर परीक्षेत एक नामवंत विद्यापीठाचे गोल्ड मेडल मिळविलेला. तेही वाणिज्य विषयातले! पुरोगामी चळवळीत काम केलेला. व्यवहारचतुर घरातला... वडील नोकरी करीत एका अनियतकालिकाचे संपादक राहिलेले. पण हा गडी साध्या व्यवहाराच्या पहिल्या परीक्षेत मात्र चाचपडत होता.

माझा दुसरा एक मित्र, माझ्या खेडेगावतला...वडील आयुष्यभर मोलमजुरी करणारे... सोबत असेल तसे दारु नि विडीचे व्यसन जोपासणारे...हा माझा मित्र शाळेत जाण्याच्या वयातच मजुरी करु लागला. शाळेची पायरी चढण्याच्या वयात ऊस तोडणीचा कोयता हाती घ्यावा लागला....साखर कारखान्याच्या हंगामात ऊस तोडणी मजूर म्हणून जाऊ लागला...शाळा पाहिलीच नाही... यामुळे लिहिण्या-वाचण्याचा संबंध आला नाही.

हा मित्र शाळेत गेला नाही. पण त्याला बुद्धी मात्र अचाट आणि अफाट...अडाणी असला तरी कमालीचा सकारात्मक! मोठी मोठी स्वप्ने पाहणारा... मजूर म्हणून दुसऱ्याच्या बैलगाडीवर सुरुवातीची काही वर्षे चालविली... त्यानंतर त्याने पै पै जमा करीत त्याला कर्जाची जोड देवून स्वत:ची बैलजोडी आणि गाडी तयार केली. त्यानंतर दोन-तीन वर्षात सात-आठ बैलगाड्यांची टोळी करुन त्याने कारखान्याची ठेकेदारी मिळविली.

काम कोणतेही असले तरी त्याचा गुणात्मक आणि संख्यात्मक दर्जा पुढच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा असतो. काम ऊसतोडणीचे असले तरी शेतमालक, कारखान्याचे साहेब, कर्मचारी यांच्या मनात भरेल असेच काम करणार...काम कसे करावे... याचा उत्तम नमुना म्हणून ध्यानात राहील असे काम तो करीत राहिला. दर्जेदार ऊसतोडणी....गाडी लोड करण्याची आदर्श पद्धती...ती जास्तीत जास्त लोड करुन तो बांधणी करीत असे. सर्वाधिक मजुरी घेणारी टोळी म्हणून त्याने अल्पावधीत लौकिक मिळविला. आपल्या मजुरांकडून जास्तीचे काम करुन घेवून त्यांना चांगली मजुरी किंवा वेतनही तो देऊ लागला. यामुळे बैलगाड्यांची आणि त्यांच्या टोळींची संख्या वर्षागणिक वाढत गेली. त्यानंतर त्याने एकापेक्षा अधिक कारखान्यांची ठेकेदारी मिळविली. प्रचंड कष्ट, सचोटी, व्यवहारकुशलता, कारखान्याचे अधिकारी, व्यापारी यांच्याशी उत्तम संबंध यामुळे त्याला प्रचंड पैसा मिळू लागला. त्याला भावाचीही चांगली साथ मिळाली. विसावे शतक संपण्याच्या आसपासच्या दहा वर्षाच्या काळात त्याने जवळपास पन्नास एकर शेती विकत घेतली. त्या शेतीत पाण्याचे नवे स्त्रोत निर्माण केले. केवळ कांदा आणि डाळिंबांचे त्याचे दरवर्षाचे उत्पन्न पन्नास लाखापेक्षा जास्त असते.

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात महाराष्ट्रातले सर्वच साखर कारखाने हळूहळू डबघाईला यायला लागले. या व्यवहारी मित्राने हे खूप लवकरच ओळखले. ठेकेदाराकडे लागणारा पैसा आणि मजूर हळूहळू कमी करीत त्याने शेतीवर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली. मधल्या काळात गावातल्या राजकारणात सहभाग घेतला, पण त्याची परिणिती तंट्या-बखेड्यात होऊन कुटुंब आणि व्यवसायावर होऊ लागताच त्याने राजकारणाचा नाद सोडला.

एकेकाळी ज्याचे चार कुटुंब मोलमजुरी करुनही त्यांचे पोट भरत नसे त्याचे कष्ट, व्यवहारकुशलता आणि बौद्धिक चातुर्यामुळे तो आज परिसरातील प्रगतीशील आणि अधिक उत्पन्न घेणारा शेतकरी म्हणून परिचित आहे. तो शाळेत कधीही गेला नाही, पण त्याचे अडले नाही. शाळा माणसाने आणि आपण तयार केल्या. त्यात चांगले गुण मिळालेले तरुण आणि प्रौढही रस्त्या-

रस्त्यावर भटकतांना आपण पहातो. या मित्राने शाळा पाहिली नाही. पण बुद्धी मात्र त्याला निसर्गदत्त देणगी म्हणून मिळाली. त्या बुद्धीला कष्टाची, सचोटीची, सकारात्मकतेची जोड देत त्याने कधीही मागे वळून पाहिले नाही. या सर्व प्रवाहात तो अतिशय व्यवहारी राहिला. कर्तव्यकठोर राहिला आणि विशेष म्हणजे मोठी स्वप्ने पाहात राहिला. यामुळेच लक्ष्मी त्याच्या घरी पाणी भरतेय.

असे माझे दोन्ही मित्र हुशार, एक शाळेत गेला नाही. मात्र त्यामुळे त्याचे अडले नाही. बुद्धी असल्याने औपचारिक शिक्षण घेता आले नाही तरी, अनौपचारिक शिक्षण आणि व्यवहार कुशलतेमुळे त्याने प्रगती साधली. दुसरा उच्चतम शिक्षण घेऊन विद्यापीठात स्थिरावला. मात्र व्यवहारकुशलता कमी पडल्याने आहे त्यात समाधान मानत फार काही करु शकला नाही.

माझा हा मित्र परंपरागत शाळेत गेलेला नसला तरी त्याच्याकडे सरस्वतीचा सहवास आहेच असे मला वाटते. या सरस्वतीरुपी हुशारीला कष्ट, सचोटी, व्यवहार आणि सातत्याची जोड दिल्याने त्याच्या घरी लक्ष्मी दीर्घकाळ वास करीत आहे, हे एक वास्तव म्हणावे लागेल.

(अरविंद पाठक : एक चालते बोलते 'साहित्य' पान ८ वरून)

सरांनी सहजपणे स्विकारलं.

सरांचा मुलगा स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय करतोय. 'प्रिंट मिडीया'मध्ये असून स्वत:ची ओळख निर्माण करतोय. मुलगीही आता स्थिरस्थावर झालीए. सरांना विचारलं की माझ्या महाविद्यालयात माझ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला याल का? त्यावेळी उत्साहाने म्हणाले "नक्की येईन, पण मला म्हाताऱ्याला ऐकतील का आताची नवीन पोरं." त्यांच्या बोलण्यात परत हुरुप जाणवत होता. म्हणाले, "माझ्याकडे माझी गाडी आहे. नक्की येईन. पैशांसाठी नाही समाधानासाठी." फोन ठेवला. मनात आलं इतका डेडीकेटेड आणि डिव्होटेड शिक्षक मिळाला तर शिक्षणक्षेत्राचं खऱ्या अर्थाने कल्याण होईल. सुरुवातीला थोडे हताश असलेले सर फक्त शिकविण्याच्या विचाराने किती प्रफुल्लीत झाले. मला घरी यायचं आमंत्रण देऊन पुस्तक घेऊन जा हवी तेवढी म्हणून आणि मनभर आशीर्वाद देऊन त्यांनी संवाद संपवला. खरंच मन भरुन आलं.

नगारा प्रकाशन

संग्रही ठेवावीत, भेट द्यावीत, केव्हाही काढून वाचावीत अशी नगारा प्रकाशनची उत्तम संस्कारक्षम पुस्तके.....

अंतरीचे धावे मूल्य : १८० रुपये

अंत:स्वर मूल्य : २४० रुपये

लेखक : डॉ. विनोद गोरवाडकर

संपर्क : गोरवाडकर वाडा, जयंत प्रिंटींग प्रेस, ८५२, मालेगांव कॅम्प जि.नाशिक मो. ९४२३४७७२७३

(वेगवेड्यांनो, तुम्हालाही वाट पाहणारं घर आहे! पान २ वरून)

घराबाहेर पडलेला घरी सुखरुप परत यावा अशी घरातल्या प्रत्येकाची मनापासून तीव्र इच्छा असते. त्यामुळे घरात काम करताना, टि.व्ही बघताना, कान, डोळे, मन हे घराबाहेर पडलेल्यांचा विचार करत दिनक्रमात बुडून गेललं असतं. कितीही निर्दय, कठोर हृदयाचा माणूस असला तरी कुटुंबाचा सदस्य म्हणून त्याच्या मनाचा एक कोपरा हळवाच असतो. वरकरणी तो दाखवत नसला तरी त्याच्या त्या कोपऱ्यात एक सूक्ष्म विचार घराबाहेर पडलेल्यांबद्दल असतोच असतो. कुणीही कितीही नाकारत असलं तरी त्यामुळं टीव्हीवरच्या बातम्या पाहत असतांना एखाद्या अपघाताची बातमी दाखवणं चालू असेल तर त्याचे डोळे स्क्रीनवर आणि मन फोनकडे असतं.

घर या शब्दाचा आपल्याला माहीत असलेल्या अर्थापलीकडचा एक अर्थ असतो. तो लक्षात घेतला किंवा नव्या पिढीला उमगला तर वेगाचं वेड कमी होऊ शकेल.

का कुणास ठाऊक पण जेव्हा प्रचंड स्पीडनं जाणारी वाहने बघितली की या वेगवेड्यांना कळकळीने सांगावसं वाटतं, की बाबांनो, तुमचं घर तुमची वाट बघत पाहतंय, घरातल्या भिंतींनी, घरातल्या सगळ्या नात्यांनी, घरातल्या वातावरणानं तुम्हाला लहानाचं मोठं होतांना पाहिलंय. आठवणींचे श्वास जपलेत, तुमच्या व्यथा-वेदना, अश्रूंनी बऱ्या केल्यात. तुमच्या सुखाच्या क्षणांना साथ दिली आहे आणि दु:खाच्या वेळी तुमचं दु:ख आपलं मानलं आहे. आनंदाच्या वेळी मोहरुन गेलेलं घर तुमच्या निराशेच्या वेळी तुम्हाला गोंजारुन उमेद देणारं झालं होतं, हे विसरु नका. वाढत्या वयातल्या प्रत्येक प्रगतीच्या वेळी आसमून वाट पाहणारं घर, तुमच्या येण्याच्या वेळी पंचप्राण डोळ्यात आणून, वाट बघत होतं. तुमच्या आशा आकांक्षांची स्वप्नं पूर्ण होण्यासाठी आपल्या मनातल्या स्वप्नांना भूतकाळात लोटत होतं, हे विसरुन कसं चालेल? बोबडे बोल, अवखळ बाल्य, निरागस हट्ट, निर्हेतूक हास्य या सगळ्या गोष्टींनी भारुन गेलेल्या घराचं अवघं घरपण तुमच्या घरात येण्यानं पुनर्जिवित होत हे लक्षात ठेवायला हवं. आई, वडील, बहीण, भाऊ, सून, मुलगा, आजी, आजोबा, नातवंडं सगळे काय केवळ एकत्र राहणाऱ्या व्यक्ती नसतात, त्यांच्या एकत्र राहण्याचा अदृश्य रेशीमबंध तुम्ही असता, ते मायेचे पाश नसतात, मायेचा ओलावा असतो. तो दृढ रहायला हवा असेल तर बाहेर पडणाऱ्या प्रत्येकानं वेगावर नियंत्रण नको का ठेवायला? ॲक्सीलेटर वाढवितांना प्रत्येक सेकंदाला किती स्पीडनं किती अंतर गाडी पुढे जाते हे पाहण्यापेक्षा हा प्रत्येक सेकंद घर लक्षात ठेवायला हवे.

घर लक्षात ठेवायलाच हवं, कारण ते हळवं असतं. ते संवेदनशील आसतं. कुणाच्या तरी चुकीनं झालेल्या भीषण अपघाताच्या दृश्यानं ते थरकापलेलं असतं. वेगावर नियंत्रण ठेवलं नाही तर होणाऱ्या भीषण वास्तवाच्या कल्पनेनंच ते गोठून गेलेलं असतं. उध्वस्त होणारी स्वप्नं, नात्यांचं आक्रंदन, पिळवटून टाकणारा आक्रोश, भवितव्याची अंधारी भयाण पोकळी घराला सुन्न करुन टाकत असते. वेगाच्या नशेचा अंत रस्त्यावर होतो आणि त्याचा थेट परिणाम घरावर होत असतो हे वास्तव प्रत्येकानं समजून घ्यायला हवं.

आपलं प्रत्येकाचं घर आपल्या सुखरुप येण्याची वाट पाहत असतं.

आणि अशी सर्वच घरं वाट पाहणारी असतात, सर्वच.....

■■■